नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ३५

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३

मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नावः सय्यद अहेमद सय्यद महेबुब,
वयः३४ वर्षे, व्यवसायःशेती.
राहणारः सिरजखोड ता.धर्माबाद जि.नांदेड.

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. शिखरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>

मी सर्व आरोपी, फिर्यादी व साक्षीदार सय्यद अजर अल्ली यांना ओळखतो. आम्ही सर्व एकाच गावचे राहणारे आहोत. दिनांक १२/०५/२०२० रोजी आरोपी क्र.१ च्या सांगण्यावरुन ट्रॅक्टर भरुन माती घेऊन आरोपी क्र.१ च्या घरी आलो. आरोपी व फिर्यादी यांच्या घरादरम्यान मोकळी जागा आहे. मी ती माती त्या मोकळया जागेमध्ये टाकली. तेवढयात फिर्यादीने येऊन आरोपी क्र.१ ला सांगितले की, ही माझी जागा आहे, येथे माती टाकु नको. त्यावेळी आरोपी क्र.१ ने लोखंडाच्या फुकनीने फिर्यादीच्या डोक्यावर मारले. त्यामुळे त्याचे डोके फुटले. त्यानंतर फिर्यादीचा मुलगा सय्यद अजर हा धावत आला. तेवढयात आरोपी क्र.१ ची पत्नी यास्मीन व मुले फुरखान आणि रिहान तेथे आले. रिहानने अजरला लाकडी काठीने डोक्यावर मारले तर फुरखान ने त्याला लाथा-बुक्यांनी मारहाण केली. अजरचे डोके फुटले त्यातुन रक्त निघाले. यास्मीन बेगमने फिर्यादीच्या पाठीवर दगडाने मारले. आरोपींनी फिर्यादी व त्याच्या घरच्यांना धमकी दिली की, तु जर आम्हाला येथे माती टाकु दिली नाही तर तुम्हाला जिवाने खतम करतो. मी स्वत:, अरबाज अल्ली, सय्यद शाहीन यांनी त्यांचे भांडण सोडवले. ज्या वस्तुने फिर्यादी व त्यांच्या मुलांना मारहाण झाली त्या वस्तु दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त मुद्देमाल अर्टिकल-२५ काठी, अर्टिकल-२६ लोखंडी रॉड आणि अर्टिकल-२७ वरील दगड दाखवण्यात आला. हया त्याच वस्तु आहेत. ज्यांनी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मुलाला मारहाण केली होती.

०२. दिनांक १३/०५/२०२० रोजी पोलीसांनी मला ज्या ठिकाणी घटना घडली म्हणजे फिर्यादी व आरोपीच्या घरादरम्यानची मोकळी जागा येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. घटनास्थळाच्या एका बाजुला रस्ता, दुस-या बाजुस शेत व उर्वरित दोन बाजुना फिर्यादी व आरोपींचे घर आहे. पोलीसांनी त्या जागेचा माझ्या समक्ष पंचनामा केला. तो पंचनामा मला आता दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. <u>घटनास्थळ पंचनाम्यास निशाणी क्र.३६</u> देण्यात येत आहे.

<u>निशाणी क्र.३८ वरील आदेशान्वये सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

**(**एस.ए.हरणे**)**

दिनांक**:** २१.०६.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**,** धर्माबाद**.**

नि. फौ. ख. क्र.७५/२०२०
सरकार विरुध्द मिर्झा जावीद बेग
निशाणी क्र. ३७

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४
मी शपथेवर निवेदन करतो की,

माझे नावः सय्यद रिजवान सय्यद सादक घैरी,
वयः३१ वर्षे, व्यवसायःट्रॅक्टर चालक.
राहणारः सिरजखोड ता.धर्माबाद जि.नांदेड.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. शिखरे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.

मला शाहीन या दुस-या नावाने देखील ओळखले जाते. मी आरोपी व फिर्यादी यांना ओळखतो. आम्ही सर्व एकाच गावात राहतो. आरोपी व फिर्यादीच्या घरादरम्यान मोकळी जागा आहे. दिनांक १२/०५/२०२० रोजी आरोपी क्र.१ ने माती बोलवली होती. त्यामुळे ट्रॅक्टर भरुन माती घेऊन आम्ही म्हणजे मी व अरबाज आरोपीच्या घराजवळ गेलो. त्यांच्या घरासमोर असलेल्या मोकळया जागेत ती माती उतरवत असताना फिर्यादी सय्यद दादु तेथे आला व इथे माती टाकु नको असे आरोपी क्रमांक १ ला सांगत होता. आरोपी क्र.१ ने शिवीगाळ केली. आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी फुकनीने मारले. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला रक्ताची जखम झाली. फिर्यादीचा मुलगा तेथे धावत आला. आरोपी क्र.१ चा मुलगा रिहान याने फिर्यादीचा मुलगा अजर याच्या डोक्यावर लाकडाने मारले. तर आरोपीचा दुसरा मुलगा फुरखान याने लाथा बुक्यांनी अजरला मारला. आरोपी क्र.१ ची पत्नी यास्मीन हिने दगडाने फिर्यादीच्या पाठीवर मारले. त्यांचे भाडण मी, अरबाज आणि दुस-या लोकांनी सोडवले. ज्या वस्तुने फिर्यादी व त्यांच्या मुलांना मारहाण झाली त्या वस्तु दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त मुद्देमाल अर्टिकल-२५ काठी, अर्टिकल-२६ लोखंडी रॉड आणि अर्टिकल-२७ वरील दगड दाखवण्यात आला. हया त्याच वस्तु आहेत, ज्यांनी आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मुलाला मारहाण केली होती.

निशाणी क्र.३८ वरील आदेशान्वये सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

**(एस.ए.हरणे)**

दिनांक: २१.०६.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.